# ठाणेमहानगरपालिका, ठाणे

महानगरपालिकाभवन, डॉ.अल्मेडारोड, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे-४००६०२.

दूरध्वनी:२५३३१२१९/२५३३१५९०


वृत्तविशेष क्र : 102 दिनांक : 27/03/2025

# झाडांच्या धोकादायक फांद्या काढण्याचे काम मार्चपासून सुरू

## अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी दिली माहिती
## संभाव्य धोके व नुकसान टाळण्यासाठी ठाणे महापालिकेचे नियोजन

दरवर्षी ठाणे महानगरपालिकेतर्फे पावसाळयापूर्वी मे व जून महिन्यामध्ये झाडांच्या धोकादायक फां्द्यांची छाटणी केली जाते. मात्र पावसाळयात वादळी वाऱ्यामुळे व अन्य नैसर्गिक कारणांमुळे काही झाडे उन्मळून पडतात, ज्यामुळे नागरिकांच्या जिवास व मालमत्तेस धोका निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर, संभाव्य धोके टाळण्यासाठी यावर्षी नियोजित वेळेच्या दोन महिने आधीपासूनच म्हणजेच, मार्च महिन्यापासूनच धोकादायक फांद्या काढण्याच्या मोहीमेची सुरुवात करण्यात आल्याची माहिती ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी दिली.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार, शहरातील प्रमुख रस्ते, पदपथ, सार्वजनिक ठिकाणे, शाळा, रुग्णालये, उद्याने, चौक, बस स्टॉप आणि रहिवासी परिसरातील धोकादायक फांद्याची छाटणी करण्यात येत आहे. पावसाळयात विद्युत तारा आणि झाडांच्या फांद्यांचा संपर्क होवून अपघात होण्याची शक्यता लक्षात घेऊन तांत्रिक दृष्टीने ही छाटणी केली जात आहे. त्यासाठी प्रभाग समितीनिहाय सर्वेक्षण करण्यात आले असून सुमारे ६३६७ झाडांच्या धोकादायक फांद्या काढण्यात येत आहेत, असे अतिरिक्त आयुक्त माळवी यांनी स्पष्ट केले.

या मोहिमेची माहिती देण्यासाठी महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात गुरूवारी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त (उद्यान) मधुकर बोडके, वृक्ष अधिकारी राजेश सोनावणे, वरिष्ठ उद्यान अधिक्षक केदार पाटील उपस्थित होते.

नौपाडा-कोपरी (९५४), उथळसर (७९८), लोकमान्य नगर-सावरकर नगर (७८७), वागळे (७३७), माजिवडा-मानपाडा (१०९१), वर्तकनगर (१३०१), कळवा (४२३), मुंब्रा आणि दिवा (२७६) येथे झाडांचे सर्वेक्षण झाले आहे. याशिवाय, आतापर्यंत, सुकलेली सुमारे १५० झाडे निर्दशनास आली असून त्याबाबतची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ती झाडेही तोडण्यात येणार आहेत. उन्हाळ्यात झाडांच्या सावलीचा जास्तीत जास्त लाभ नागरिकांना मिळावा व झाडांची नैसर्गिक वाढ अबाधित रहावी, यासाठी अत्यावश्यक असेल तेथेच धोकादायक फांद्यांची छाटणी केली जात आहे. या दरम्यान, झाडांवरील पक्षांची घरटी व इतर जैवविविधता सुरक्षित ठेवण्यासाठी विशेष काळजी घेतली जात असल्याचेही अतिरिक्त आयुक्त माळवी यांनी सांगितले.

वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्रभागातील माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधी यांच्याशीही या मोहिमेबाबत संपर्क साधण्यात आला आहे. त्यांच्याशी समन्वय साधून आवश्यक त्या ठिकाणी झाडांच्या धोकादायक फांद्याची छाटणी करण्यात येत असल्याचेही अतिरिक्त आयुक्त माळवी यांनी नमूद केले. यातून निर्माण होणारा हरित कचरा संकलित करुन शास्त्रशुध्द पध्दतीने सेंद्रिय खत निर्मितीकरिता ठाणे महानगरपालिकेच्या कोपरी येथील हरित कचरा व्यवस्थापन केंद्राकडे पाठविण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, महापालिकेच्या उद्यान विभागाने धोकादायक, सुकलेल्या झाडांचे सर्वेक्षण केलेले आहे. तरीही नागरिकांनीही परिसरातील धोकादायक झाडांबाबत ठाणे महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागास त्वरित माहिती द्यावी. ही मोहीम केवळ झाडांची छाटणी करण्यापूर्ती मर्यादित न राहता शहरातील हरित क्षेत्र टिकविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे. या मोहीमेत नागरिकांनी सक्रिय सहभाग घेऊन शहराच्या पर्यावरण संवर्धनासाठी सहकार्य करावे, असे यावेळी अतिरिक्त आयुक्त माळवी यांनी केले आहे.

**तक्रारी नोंदवण्यासाठी संपर्क क्रमांक**

धोकादायक झाडांबाबत नागरिकांना आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी १८००-२२२-१०८ आणि ८६५७८८७१०१ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.